**<u>रेग्यु. दिवाणी मुकदमा नं.३३८/१३ मधील नि.४८ खालील आदेश</u>**

१. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचेविरुध्द दाखल करुन दावा मिळकती संबंधाने जाहीर ठराव, वाटप व अन्य दादी मंजुर होवुन होवुन मिळणेसाठी केला आहे. सदर दाव्यात वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ६ रुल १७ अन्वये अर्ज देवुन दाव्यात खालील दुरुस्ती करणेविषयी विनंती अर्ज दिलेला आहे.

२. प्रस्तुत दावा कलम १ मध्ये गट नं.३३६ चा आकार रु.८—०० यास काट देवुन त्याऐवजी ''८रु.—०४पैसे'' असे लिहणेस, दावा कलम १ मध्ये गट नं.३३७, ३—२९, १०—४४, ०हे.—५९आर यास काट देवुन त्याऐवजी ''३३७/३, ०—५९, १—८८'' असा मजकुर लिहणेस व दावा कलम १ मध्ये चतु:सिमेमध्ये दक्षिण बाजुकडील गट नं.३३२ नंतर ''जादा गट नं.३३३, ३३५, ३३६'' असा मजकुर लिहणेस परवानगी मागितली आहे. याशिवाय दावा कलम १२ संपलेनंतर त्यामध्ये ''१२अ) प्रस्तुत दावा प्रलंबीत असताना प्रतिवादी नं.१ ने दावा मिळकती संबंधाने त्याची जनक आई, धाकटी बहीण, ५ आत्या, एका मयत आत्याचे वारसाकडुन ता.९/१०/२०१४ रोजी नोंदणीकृत हक्कसोडपत्राचा लेख अस्तित्वात आणला आहे. सदर हक्कसोडपत्र फलटण येथील मे.दुय्यम निबंधकसाो, फलटण यांचे कार्यालयात अ.नं. ५९०२/१४ प्रमाणे नोंदलेला आहे. वर नमुद बाबीचा साकल्याने विचार करता वादीचा दावा पुर्णपणे कायदेशीर असलेचे स्पष्टपणे दिसते''.

येणेप्रमाणे रेकॉर्डवर दुरुस्ती करणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे ऑर्डर ६ रुल रुल १७ प्रमाणे दाखल केला आहे. प्रस्तुत दुरुस्ती न्यायाचे दृष्टीने आवश्यक असुन त्यामुळे दाव्याचे मुळ स्वरुपात कोणतेही फेरबदल होत नाहीत. म्हणुन वादी यांनी सदरचे अर्जान्वये दाव्यात दुरुस्ती करुन रेकॉर्डवर घेणे करीता विनंती केली आहे.

३. सदर दाव्याकामी वरील नि.४८ वर Other side to say असा आदेश पारीत झाला आहे. परंतु प्रतिवादी यांनी या दुरुस्तीबाबत आपले म्हणणे दाखल केलेले नाही.

४. सदरचा दावा जाहीर ठराव, वाटप व अन्य दादीसाठी केलेला असुन सदरच्या दाव्यात मुद्दे निघालेले नाहीत. शिवाय प्रतिवादी यांनी आपले काहीच म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे या वेळेस जर वादीस रेकॉर्डवर

दावा दुरुस्ती करण्याची परवानगी दिली तर प्रतिवादींना त्यात कैफियत देण्याची संधी मिळेल. प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादींनी सुचविलेली दावा दुरुस्ती ही नाममात्र, तांत्रिक स्वरुपाची असलेने त्यामुळे दाव्याचे मुळ ढाच्यामध्ये कोणतेही फेरबदल होत नाही. सबब वादी यांचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. यावरुन खालील आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. वादींचा नि.४८ वरील अर्ज विना अट मंजुर करणेत येत आहे.

२. वादींना दाव्यात मागितलेली दुरुस्ती करणेकरीता रु.२००/— विधी सेवा समिती कार्यालय फलटण येथे भरणेचे अटीवर मंजुर करणेत येते.

३. वादींनी दाव्यात १४ दिवसाचे आत दुरुस्ती सामील करुन दावा दुरुस्ती प्रत दाखल करावी.

फलटण
ता.१८/०३/२०१९

(अर्चना ह. ठाकुर)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, फलटण.